**प्रेसनोट** **दिनांक २९/०८/२०१९**

## येरवडा पोलीस स्टेशन,पुणे
## तडीपार गुन्हेगारास अटक

---

येरवडा पोलीस ठाण्याचे हद्दीतील गुन्हेगार नामे शाहरूख शाहीद सैय्यद, वय २७ वर्षे, रा. नुराणी मश्जिद जवळ, लक्ष्मीनगर येरवडा, पुणे याचे विरूध्द येरवडा पोलीस ठाण्याचे हद्दीत खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरीचोरी, घातक शस्त्राने दुखापत, धमकावणे अशा प्रकारचे एकूण १० गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्हेगार येरवडा परिसरात दहशत पसरवित असल्याने त्यास मा.पोलीस उप आयुक्त साो. परि-४, पुणे यांनी त्यांचे कडील तडीपार आदेशक्र. १४/२०१९ मुंबई पोलीस ॲक्ट क. ५७ प्रमाणे दि.२०/०२/२०१९ रोजी पासून २ वर्षाचे कालावधी करीता पुणे शहर व पुणे जिल्ह्यातून तडीपार करण्यात आलेले आहे.

दिनांक २८/०८/२०१९ रोजीश्री. युनूस शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,येरवडा पोलीस स्टेशन यांचे आदेशाने व मार्गदर्शना खाली येरवडा पो.स्टे.कडील तपास पथकाचे पो.उप.निरी.श्री. मंगेश भांगे, स.पो.फौ. बाळू बहिरट, पो.शि. ७२८० शरद बांगर, पो.शि. १०००४ अजय पडोळे, पो.शि. ७८०५ कानिफनाथ कारखेले असे दि.२८/०८/२०१९ रोजी रात्रौ येरवडा पोलीस ठाण्याचे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना, बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, येरवडा पो.स्टे.रेकॉर्डवरील तडीपार गुन्हेगार नामे- शाहरूख शाहीद शेख हा शाहदल बाबा चौक, येरवडा येथे रोडचे कडेला थांबलेला आहे, अशी बातमी मिळताच वरील नमूद पथकाने तात्काळ सदर ठिकाणी जावून सापळा रचून बातमी प्रमाणे खात्री करून नमूद तडीपार गुन्हेगार नामे- शाहरूख शाहीद सैय्यद, वय २७ वर्षे, रा. नुराणी मश्जिद जवळ, लक्ष्मीनगर येरवडा, पुणे यास ताब्यात घेवून त्याचे कडे तडीपार कालावधीत पुणे शहरात येण्याची त्याने परवानगी घेतली आहे अगर कसे? याबाबत विचारणा केली असता त्याने अशी कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे सांगितले आहे.त्यावेळी तो काहीतरी लपवित असल्याने, त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कमरेला एक लोखंडी कोयता मिळून आला. वरील नमूद तडीपार गुन्हेगार वरील तडीपार आदेशाचा भंग करून, कोणतीही परवानगी न घेता येरवडा पोलीस ठाण्याचे हद्दीत मिळून आल्याने त्याचे विरूध्द पो.शि. ७८०५ कानिफनाथ रंगनाथ कारखेले, येरवडा पो.स्टे. यांनी दिलेल्या फिर्यादी वरून त्याचे विरूध्द येरवडा पो.स्टे.गु.र.नं. ६१३/२०१९ मुं.पो.ॲ.१४२, व ३७(१) सह १३५, आर्म ॲक्ट क. ४(२५) प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आलेला असून त्यामध्ये त्यास अटक करणेत आली आहे तसेच त्याचे कडे मिळून आलेला कोयता जप्त करण्यात आला आहे.

अशा प्रकारे येरवडा पो.स्टे.कडीलपो.उप.निरी.श्री. मंगेश भांगे, स.पो.फौ. बाळू बहिरट, पो.शि. शरद बांगर, पो.शि. पडोळे, पो.शि. ७८०५ कानिफनाथ कारखेले अशा पथकाने सराईत तडीपार गुन्हेगारास अटक करून उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

**( युनूस शेख )**
वरिष्ठ पोलीसनिरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे